**परिवहन आयुक्त कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, ३ रा ४ था मजला,**
**सरकारी वसाहत, वाद्रें (पूर्व)**
**मुंबई ४०००५१**

## : निविदा सूचना :

परिवहन आयुक्त कार्यालय, वांद्रे येथील तिस-या व चौथ्या मजल्याची व ०६ प्रसाधन गृहांची साफसफाईच्या कामांकरिता मनुष्यबळ आणि साहित्य/सामग्री पुरविण्यासाठी सन २०१५-१६ या वर्षासाठी विहित नमुन्यातील निविदा अर्जावर मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. या निविदा फॉर्मची किंमत रु. ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) इतकी असून, ते **रचना व कार्यपध्दती अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकीय इमारत, ३ रा व ४ था मजला, सरकारी वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१ यांच्याकडे दिनांक २७/०२/२०१५ पासून दिनांक ०५/०३/२०१५ पर्यंत दुपारी ४.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.** निविदेतील कामाचे स्वरुप व अटी/शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. कार्यालयाच्या तिस-या व चौथ्या मजल्यावरील खालील नमूद क्षेत्रफळाची जागा कार्यालयीन वेळेपूर्वी म्हणजे सकाळी ९.३० पर्यंत झाडून सफाई करणे.

| | |
|---|---|
| चौथा मजला | १२,००० चौ फुट |
| तिसरा मजला | ६,००० चौ फुट |
| अभिलेख कक्ष,लेखनसामग्री कक्ष व व्हरांडा अशी एकूण ७,५१५ जागा वगळून | ७,५१५ चौ फुट |
| **एकूण** | **१०,४८५ चौ फुट** |

२. कार्यालयातील फरशा डिटर्जंट/ फिनाईल मिश्रित पाण्याने दररोज साफ करणे.

३. कार्यालयातील ०४ पुरुष व ०२ महिला एकूण ०६ प्रसाधनगृहे डिटर्जंट व फिनेल वापरुन दिवसातून तीन वेळा म्हणजे सकाळी ९.३० वा. पूर्वी, दुपारी १.०० वा. पूर्वी व सायंकाळी ४.०० वा. पूर्वी साफ करणे. सर्व प्रसाधनगृहात डांबर गोळया टाकणे, दिवसातून तीन वेळा लिक्विड साबण ठेवणे व मो-या तुंबल्यास त्या साफ करणे. साफसफाई करिता लागणारे आवश्यक सर्व साहित्य ठेकेदाराने पुरवठा करणे बंधनकारक आहे.

४. कार्यालयातील मांडण्या व कपाटे रोज साफ करणे तसेच कार्यालयातील खिडक्या व दरवाजे साफ करणे.

५. कार्यालयातील खिडक्यांच्या काचा रसायन आणि पाण्याने साफ करणे व अधिकारी कक्षाचे दुभाजक आठवडयातून एकदा पाण्याने साफ करणे.

६. कार्यालयातील भिंती, छते आठवडयातून एकदा साफ करणे व कोळीष्टके काढून टाकणे.

७. कार्यालयातील सर्व दिवे/पंखे महिन्यातून एकदा साफ करणे.

८. कार्यालयात आलेले पावसाचे पाणी काढून कार्यालयीन जागा कोरडी करणे.

९. ठेकेदाराने आठवडयातून दोनदा कार्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन साफसफाईच्या कामासंदर्भातील अडचणीचे निवारण करणे.

१०. ठेकेदारास १८ वर्षापेक्षा जास्त वय असणारे स्थानिक कर्मचारी (शासकीय धोरणानुसार) नियुक्त करावे लागतील. सदर कर्मचाऱ्यांपैकी महिला प्रसाधनगृहांच्या साफसफाईकरिता किमान २ महिला व एक पर्यवेक्षकीय कर्मचारी असणे आवश्यक आहे. सदर कर्मचारी पुर्ण वेळ (८ तास) काम करणारे असावेत. तसेच कचरा गोळा करण्याची व्यवस्था ठेकेदारास स्वखर्चाने करावी लागेल व त्याची विल्हेवाट लावावी लागेल.

११. ठेकेदारास प्रासंगिक कामगार कायदा (रेग्युलेशन अँन्ड ॲबॉलिशन ॲक्ट १९७०) च्या सर्व अटी पाळाव्या लागतील. ठेकेदारास शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या किमान मजुरी/वेतन दरानुसार कंत्राटी कामगारांना मजुरी द्यावी लागेल. कराराच्या रक्कमेच्या ३ टक्के किंवा कमाल रु. १०,०००/- अनामत रक्कम म्हणून दर्शनी धनाकर्षाने (Demand Draft) निविदेसोबत भरावी लागेल. धनाकर्षाऐवजी धनादेश स्विकारला जाणार नाही. निविदेसोबत अनामत रक्कम न भरल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही. धनाकर्ष " परिवहन आयुक्त, मुंबई " यांचे नांवे मुंबई येथे देय असलेला काढण्यात यावा.

निविदा **दोन** वेगवेगळया बंद लिफाफ्यात सादर करावी.

**<u>लिफाफा क्रमांक (१)</u>** (अ) तांत्रिक लिफाफामध्ये अंनामत रकमेचा धनाकर्ष

(ब) पुर्वानुभवाबाबतची तपशिलवार माहिती

(क) अशा प्रकारची निविदा अन्यत्र सादर केली असल्यास त्याबाबतची माहिती

**<u>लिफाफा क्रमांक (२)</u>** दराचा लिफाफा मध्ये साफसफाईचा मासिक दर नमूद केलेला असावा असा देकार कोणत्याही अटी/शर्तीचे अधीन नसावा.

वरील दोन्ही लिफाफ्यावर " लिफाफा क्रमांक अ " व " लिफाफा क्रमांक ब " असे ठळक अक्षरात नमूद करावे. नंतर वरील दोन्ही लिफाफे तिसऱ्या मोठया लिफाफ्यात बंद करुन त्यावर निविदे विषयीची माहिती निविदाकाराचे नांव इत्यादी माहिती ठळक अक्षरात नमूद करावी.

१२. निविदेतील शर्तीनुसार निवडण्यात आलेल्या ठेकेदारास निविदेत सुचविलेल्या दराच्या एकूण वार्षिक रकमेच्या ३ टक्के रक्कम प्रतिभूती ठेव म्हणून करारनाम्यासह दर्शनी धनाकर्षाने (Demand Draft) या कार्यालयास सादर करावी लागेल. त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

१३. ठेकेदारास प्रत्येक दिवशी कार्यालयीन वेळेत साफसफाई कामगारांना हजेरीपट प्रत्यक्ष सादर करावा लागेल. साफसफाईच्या कामात दिरंगाई/गैरवर्तन केल्याचे आढळल्यास व त्याबाबत कार्यालयीन कर्मचायांची तक्रार असल्यास ठेकेदारास स्पष्टीकरणाची संधी दिल्यानंतर तक्रार योग्य ठरल्यास प्रत्येक तक्रारीकरिता रुपये ५००/- (रुपये पाचशे मात्र) इतका दंड आकारण्यात यैईल. गैरवर्तन/अश्लिल हावभाव किंवा कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन केल्याचे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच ठेकेदाराने नेमलेल्या कर्मचाऱ्यांची दैनंदिन हजेरी न आढळल्यास त्या प्रमाणात साफसफाईच्या मासिक देयकातून वसुली करण्यात येईल.

१४. ठेकेदारास स्वखर्चाने आवश्यक किंमतीच्या मुद्रांक कागदावर करारनामा करुन दयावा लागेल. ठेकेदारास साफसफाई कामाचा एक वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. त्या अनुभवापृष्ट्यर्थ संबंधित संस्थेची प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

१५. ठेकेदाराने त्याचे कामगारांना त्यांच्या छायाचित्रासह ओळखपत्र द्यावे. ओळखपत्र असलेल्या कामगारांनाच या कार्यालयात साफसफाईच्या कामावर नेमता येईल.

१६. कामावर असतांना कंत्राटदाराच्या कामगारास कोणतीही इजा/जखम झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. परिवहन आयुक्त कार्यालयाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

१७. साफसफाईचे काम करतांना कार्यालयातील कोणतीही वस्तू हलवितांना काळजीपूर्वक हालचाल करण्याच्या सूचना कामगारांना देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. परिवहन आयुक्त कार्यालयातील कागदपत्रांची नासधूस, कार्यालयातील साहित्य, संगणक इ. वस्तूंची तोडफोड अथवा हानी झाल्यास किंवा स्वच्छतेसाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्यामुळे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. त्याची भरपाई करावी लागल्यास मासिक देयक रकमेतून कपात करण्यात येईल.

१८. ठेकेदाराने कराराच्या अटींचा भंग केल्यास ठेकेदाराची अनामत रकम जप्त करण्यात येईल.

१९. ठेकेदारास दरमहा कंत्राटाची रक्कम मागणी करण्यासाठी ३ प्रतीत देयक सादर करावे. सदर बाबत नियंत्रण शाखेने प्रमाणित केल्यानंतर देयकाचे प्रदान करण्यात येईल.

२०. न्युनतम दर सादर करणा-या अंतिमतः निवडलेल्या ठेकेदाराने या निविदेतील अटी/शर्ती प्रमाणे काम करण्यास असमर्थता दर्शविली तर त्याने जमा केलेली अनामत रक्कम जप्त केली जाईल.

२१. इच्छुक निविदाधारकांनी दि. २५/०३/२०१५ रोजी दु. ३.०० वा. निविदापूर्व बैठकीकरिता या कार्यालयाच्या बैठक सभागृहात उपस्थित राहावे.

अंतर्गत साफसफाई सन २०१५-१६ च्या निविदा परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१ येथे **दिनांक २६/०३/२०१५ पर्यंत दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारल्या जातील**. विहित वेळेनंतर निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. निविदा **दिनांक २७/०३/२०१५ रोजी दु. ३.०० वाजता** हजर असणाऱ्या ठेकेदारांसमक्ष उघडण्यात येतील. निविदांचे वाचन झाल्यावर नमूद केलेल्या दरात कोणतेही फेरफार मान्य केले जाणार नाहीत. तसेच कोणतेही कारण न देता सर्व निविदा प्रक्रिया नाकारण्याचे अधिकार परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी राखून ठेवलेले आहेत.

2/3/1?

**परिवहन उप आयुक्त (निरिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**